FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

0154149

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No. 41, वर्ष Year 2021, दिनांक Date 09/10/2021

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from 07/10/2021 वेळ Time 17:25, तारीख पर्यंत Date to 09/10/2021 वेळ Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 07/10/2021, वेळ Time 17:25
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ........, तारीख Date ........, वेळ Time ........

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name M.I.D.C. पोलीस ठाणे ~~[illegible]~~ सहाय्यक पोलीस आयुक्त मेघवाडी विभाग कार्यालय, कक्ष क्र. 28, अंधेरी (पू.) मुंबई 400093 No. if any ........ Ward ........ Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name भोजनाथ राय (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रामऋषिदेव
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 61 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9867740531
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation सेवानिवृत्त
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : रूम नं. 304, चाळी नं. 203, कुमार किलेज, त्रिवेणी नगर, मालाड (पू.) मुंबई 400097 मुल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव व क्र. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo.No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्रीमती सुजाता आबासाहेब पाटील, वय 56 वर्षे, धंदा नोकरी (पद - सहाय्यक पोलीस आयुक्त बृहन्मुंबई नेमणूक मेघवाडी विभाग मुंबई) रा.ही. ओ. विंग आदित्य को.ऑ. हौ.सो. रु.नं. 101, वर्सोवा रोड, डी.एन. नगर, अंधेरी (प.) मुंबई 400053.

भोजनाथ ऋषीदेव राय, वय ६१ वर्षे, धंदा – सेवानिवृत्त, रा.ठी. बिल्डिंग नं.३०४, खोली नं.२०३, कुरार व्हिलेज रोड, त्रिवेणी नगर, मालाड पुर्व मुंबई–४०००९७ मो.नं. ९८६७७४०५३१

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मी माझे कुटुंबासह राहावयास असुन मी रेल्वे मधुन फिटर या पदावरून एक वर्षापुर्वी सेवानिवृत्त झालो आहे. मला मिळणाऱ्या निवृत्ती वेतनावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी सन १९९९ मध्ये २२० स्क्वेअर फुटाचा गाळा नं ०३ नादीरशहा तबेला, सुभाष नगर, जोगेश्वरी (पुर्व)– मुंबई हा श्री. महेश बंग यांच्याकडून विकत घेतला आहे. सदरचा गाळा हा श्री जुनैद इक्बाल सुरती यांना दि ०४/०४/२०२१ ते दि.०३/०३/२०२२ पर्यत ११ महिन्याच्या भाडे तत्वावर दिला होता. त्याबदल्यात जुनैद सुरती यांचेकडून डिपॉझिट म्हणून रू.३०,०००/– घेतले होते व दरमहा रू.१०,०००/– भाडे घेत होतो. परंतु कोविड १९ च्या आजाराने सर्वत्र लॉकडाऊन असल्याने भाडोत्री श्री. जुनैद हे मला कोणतेही प्रकारचे भाडे देत नसल्याने दि. ०५/१०/२०२१ रोजी श्री जुनैद यांना सदरचा गाळा खाली करण्यास सांगितले व मी सदरचा गाळा माझे ताब्यात घेतला. त्यानंतर गाळयात असलेल्या लोखंडी कपाटाच्या ड्रॉवर मध्ये रू. १८,०००/– इतकी रक्कम ठेवली तसेच गाळयामध्ये एक लोखंडी टेबल व दोन लोखंडी खुर्च्या व्यवस्थित ठेवून दरवाज्यास कुलुप लावून मी सुमारे १२:०० वा घरी निघून गेलो. त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ०३:०० वा सुमारास सदर गाळयासमोरील चहावाल्यास फोन करून माझे गाळयाबद्दल विचारले असता त्यांनी परिसरातील समाजसेविका श्रीमती निता महाडीक व त्यांच्या समवेत असलेल्या तीन अनोळखी इसमानी गाळयाचे कुलुप तोडून गेल्याचे सांगितले असता मी तात्काळ माझ्या नमुद गाळयाच्या ठिकाणी जावून पहाणी केली असता माझ्या गाळयाचे मी लावलेले कुलुप तोडून लोखंडी कपाटात ठेवलेले रू. १८,०००/–, एक लोखंडी टेबल व दोन लोखंडी खुर्च्या चोरीस गेल्याचे दिसून आले.

त्याच दिवशी समाजसेविका श्रीमती निता महाडीक व त्यांच्या तीन साथीदारा समवेत माझ्या गाळया लावलेले कुलुप तोडून लोखंडी कपाटात ठेवलेली रोख रक्कम रू. १८,०००/–, एक लोखंडी टेबल व दोन लोखंडी खुर्च्या चोरीस गेल्याची तक्रार देण्यासाठी मी जोगेश्वरी पोलीस ठाणे येथे गेलो असता माझी फिर्याद न नोंदविता वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. तांबे यानी लेखी तक्रार अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी दि. ०६/१०/२०२१ रोजी मा. पोलीस उप–आयुक्त परी.१०, मुंबई, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, जोगेश्वरी पोलीस ठाणे, मुंबई यांचे नावे तक्रार अर्ज तयार केला.

मी तयार केलेला तक्रार अर्ज देण्याकरीता दि.०६/१०/२०२१ रोजी मा. पोलीस उप–आयुक्त परी. १०, व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त मेघवाडी विभाग मुंबई यांचे कार्यालय असलेल्या एम.आय.डी.सी., अंधेरी पुर्व येथे गेलो. तेथे गेल्यानंतर संबधित विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती सुजाता पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेवून जोगेश्वरी पोलीस ठाणे येथे माझी तक्रार नोंद करून घेतली नसल्याबाबत तक्रार करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात समक्ष भेटून त्यांना अर्ज दिला व सांगीतले की, जोगेश्वरी पोलीस ठाण्यात माझी तक्रार नोंद करीत नाही. तसेच श्रीमती निता महाडीक ही महिला मला त्रास देत आहे. मला त्यांच्यापासून संरक्षण मिळावे यासाठी विनंती केली. त्यानंतर श्रीमती सुजाता पाटील यांनी त्यांच्या मोबाईल वरून श्रीमती निता महाडीक यांना त्यांच्या कार्यालयात बोलाविले. साधारण

२० ते २५ मिनिटातच श्रीमती निता महाडीक हया सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीमती सुजाता पाटील यांच्या कार्यालयात आल्या.

नंतर श्रीमती पाटील मॅडमनी मला थोडा वेळ बाहेर थांबण्यास सांगितले. साधारण १० ते १५ मिनीटांनी श्रीमती पाटील मॅडम यांनी मला त्यांच्या ऑफिसमध्ये बोलाविले व श्रीमती पाटील मॅडम श्रीमती निता महाडीक यांच्या समक्ष म्हणाल्या की,'' **अभी निता मॅडम आपको तकलीब नही देंगी और आपका गाला भी खाली करने को मै उसे बोला हू।** '' त्यानंतर श्रीमती निता महाडीक यांना मॅडमने जाण्यास सांगितले व मला त्यांच्या कार्यालयात थांबवून घेतले. त्यानंतर श्रीमती सुजाता पाटील मॅडम यांनी मला '' आपका काम मैने किया आप क्या करोगे'' असे म्हटल्यावर मी त्यांना सांगितले की, '' मै रेल्वे से रिटायर हो गया हू। और मेरी आर्थिक परिस्थिती बहोत बेकार है।'' त्यानंतर श्रीमती सुजाता पाटील मॅडम म्हणाल्या की, '' वो बाई बहोत डेंजर है। वो आपके कपडे फाडके आपको ही जेल मे डालेगी। मैने आपकी मदत की है।'' असे बोलून झाल्यानंतर मॅडमनी आपल्या हाताने एक बोट दाखवून रूपये एक लाखाची माझ्याकडे मागणी केली. त्यावेळी माझ्याकडे पैसे नसल्याने मी संध्याकाळी पैसे घेवून येतो असे सांगून संध्याकाळी मी दहा हजार रूपये मॅडमला नेवून दिले व उर्वरीत रक्कम जमा करण्यासाठी एक—दोन दिवसाची मुदत मागून मी मॅडमच्या ऑफिस मधून निघून गेलो.

श्रीमती सुजाता पाटील मॅडम व माझा कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद नाही तरी देखील श्रीमती सुजाता पाटील मॅडमनी मला धमकी देवून खोली खाली करून देणे, श्रीमती निता महाडीक हिच्या त्रासापासून वाचविणे या कारणांसाठी माझ्याकडे रूपये एक लाखाची मागणी केली. त्यापैकी रूपये दहा हजार श्रीमती सुजाता पाटील मॅडमला मी दिले असून उर्वरीत लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दि. ०७/१०/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो. सदरवेळी तेथील वरिष्ठांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईकरिता पोनि कारभारी यांची नेमणुक केली. पो नि कारभारी यांनी माझे तक्रारीबाबत माझेकडे चौकशी करून तक्रारीच्या अनुषंगाने लेखी अर्ज करण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझ्या हस्ताक्षरामध्ये तक्रार अर्ज लिहून दिला.

त्यानंतर पोनि कारभारी यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख १) श्री. निशांत नागोजीराव काटे, वरिष्ठ लिपीक, मिळकत व्यवस्थापक गोरेगाव, म्हाडा, मुंबई २) श्री. प्रशांत गजानन खेडेकर, वरिष्ठ लिपीक, मिळकत व्यवस्थापक गोरेगाव, सायन, मुंबई अशी करून दिली. त्यावर पोनि कारभारी यांनी त्यांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि कारभारी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून तसेच पो.नि कारभारी यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

पो.नि. कारभारी यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणीला जाताना माझे बनियानला व्हॉईस रेकॉर्डर लावुन माझेसोबत पंच क्रमांक १ म्हणुन निशांत काटे हे येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे

समक्ष

(राहुल कारभारी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

भोजनाथ राय

लोकसेवक यांना त्यांच्या कार्यालयात अथवा ते सांगतील तेथे जावुन भेटण्याचे ठरले. त्याप्रमाणे पो.नि कारभारी, पंच व पोलीस पथक असे शासकीय वाहनाने लोकसेवकाच्या कार्यालयात जाण्यासाठी निघालो. आम्ही सर्व सिप्झ कंपनीच्या तीन नंबर गेटजवळ आल्यानंतर वाहन थांबवून पो.नि. कारभारी यांनी माझ्या शर्टच्या आतिल बनियानला व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावला व श्रीमती सुजाता पाटील मॅडम यांच्या कार्यालयात भेट घेण्यासाठी पाठविले. श्रीमती सुजाता पाटील यांच्या कार्यालयात मी पंचासोबत गेलो. श्रीमती सुजाता पाटील मॅडम यांच्याबाबत विचाारणा केली असता मॅडम घरी गेल्याचे समजल्याने आम्ही पुन्हा पोलीस वाहनाजवळ आलो त्यावेळी पो.नि कारभारी यांनी माझ्या बनियानला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून घेतला बंद केला, त्यानंतर मला काय झाले असे विचारले तेंव्हा मी त्यांना सांगीतले की, मॅडम ऑफिसमध्ये नाहीत त्या घरी गेल्या आहेत. त्यानंतर पो.नि कारभारी आजची सापळा कार्यवाही थांबवली व दि.०८/१०/२०२१ रोजी सकाळी १०:०० वा लाप्रवि कार्यालयात येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे दि. ०८/१०/२०२१ रोजी १०:०० वा. मी पुन्हा लाप्रवि कार्यालयात येवून पो.नि कारभारी यांना भेटलो. माझे, पंचाचे व पोनि कारभारी याचे वक्तव्य घेवुन, मला व पंचांना अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. कारभारी यांनी माझ्याकडे लाचेसाठी लागणाऱ्या रक्कमेबाबत विचारणा केली असता माझे बचतीमधील रू.९,०००/— माझ्याकडे असल्याचे मी त्यांना सांगितले. त्यावेळी पो.नि कारभारी यांनी मला मॅडमना भेटण्याकरीता जाल तेव्हा मॅडमशी काही तडजोड करून संभाषणामध्ये तडजोडी अंती ठरलेल्या लाचेच्या रक्कमेचा आकडा आल्यानंतर उर्वरीत लागणारी रक्कम ही आपण खेळण्यातील नोटांची रक्कम वापरू असे सांगितले. त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी श्रीमती पाटील मॅडम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डोळयावरील चष्मा उजवे हातात घेवुन फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर मी, दोन शासकिय पंच व पोलीस पथक असे श्रीमती सुजाता पाटील यांचे कार्यालय सहाय्यक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग, मुबंई कडे दोन शासकीय वाहनाने रवाना झालो. आम्ही अंधेरी चकाला जंक्शन, बजाज अलायन्स इमारती समोर आल्यानंतर पोलीस वाहने थांबली. त्यानंतर पो.नि कारभारी यांनी मला सुचना दिल्याप्रमाणे श्रीमती सुजाता पाटील यांचे कार्यालयात पडताळणीकरीता जाण्यासाठी डिजीटल रेकॉर्डर चालू करून माझ्या शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. काटे यांचेसह पाठविले. मी व पंच, श्रीमती सुजाता पाटील यांचे कार्यालयात गेलो असता तेथे माझे ओळखीच्या ममता कदम या भेटल्या. त्यांनी मला सांगीतले की, पाटील मॅडम कार्यालयात नाहीत त्या थोडया वेळात येणार आहेत, तसेच त्यांचे फोनवरुन बोलणे झाल्याचे सांगीतले. थोडया वेळाने पाटील मॅडम कार्यालयात आल्या, त्यांनी मला व ममता कदम व दोन अनोळखी पुरुष यांना हाताने ईशारा करुन त्यांचे ऑफिस मध्ये बोलाविले. मॅडमला संशय येवू नये म्हणून मी माझ्या सोबत असलेल्या पंचाना बाहेरच थांबण्यास सांगून मी आत मध्ये गेलो. मॅडमशी कामासंदर्भात चर्चा झाली त्यादरम्यान मॅडम यांनी तेथे उपस्थित ममता कदम व दोन अनोळखी पुरुषांना बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर एसीपी पाटील मॅडम यांचे सोबत पैशांबाबत चर्चा झाली व मॅडम यांनी ४०,०००/

समक्ष

(राहुल कारभारी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

भोजनाथराय

रुपये लाच स्वीकारण्यास संमती दिली, त्यानंतर मी पुन्हा अंधेरी चकाला जक्शंन बजाज अलायन्स इमारती समोर उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. कारभारी यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. श्रीमती सुजाता पाटील यांनी पडताळणी दरम्यान तडजोडी अंती रूपये ४०,०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. श्रीमती सुजाता पाटील याने लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरित सापळा कारवाई करावयाची आहे, त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना पो.नि.कारभारी यांनी दिल्या तसेच लाचेची रक्कम म्हणुन देण्याकरीता पोनि कारभारी यांचेकडे जमा केले रूपये ९,०००/— (रू. ५०० दराच्या १८ भारतीय चलनी नोटा व एका बाजुने पारदर्शक पांढरे पाकिट) तसेच पो.नि कारभारी यांनी स्वत: सोबत लाप्रवि कार्यालयातुन आणलेल्या रूपये ५०० दराच्या खेळण्यातील नोटांपैकी रूपये ३१,०००/— ( रू. ५०० दराच्या खेळण्यातील ६२ नोटा) एकत्रित केल्या व नमुद नोटांना पोहचा/हटकर यांचेकरवी अॅन्थ्रॉसीन पावडर लावली. सदरची रक्कम ही सफेद रंगाच्या एका बाजुने पारदर्शक लिफाफ्यात ठेवली व त्या लिफाफ्यास अॅन्थ्रॉसीन पावडर लावली व पैशाचा लिफाफा प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ठेवला त्यानंतर पोहचा/हटकर हे सापळा कार्यवाहीत सहभागी राहणार नसल्याचे सांगीतले.

त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डोळयावरील चष्मा काढुन उजव्या हाताने फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी माझे शर्टाचे आतील बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. काटे यांचेसह सापळा कारवाईकरीता श्रीमती सुजाता पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग,मंबई येथील कार्यालयात पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, श्रीमती पाटील मॅडम यांचे कार्यालयात गेलो असता पाटील मॅडम या त्यांचे कार्यालयात बसल्या होत्या. **त्यावेळी त्यांनी मला 'बोलो बोलो' असे म्हणाल्या.तेंव्हा मी त्यांना 'चालीस हजार' असे म्हणालो असता, त्यांनी मला 'बोलो मत' असे सांगीतले,** मी माझ्या हातातील प्लास्टिकच्या पिशवीमधील एक बाजू पारदर्शक असलेल्या पांढऱ्या रंगाच्या लिफाफ्यातील रक्कम चाळीस हजार रुपये श्रीमती सुजाता पाटील मॅडमच्या हातात दिले. त्यांनी ते पाकीट हातात घेतले व परत माझे हातात देवून श्रीमती पाटील मॅडम यांनी मला पैशाचे पाकीट हाताने ईशारा करुन बाजुच्या कपाटात ''उपरवाला खोल के रखो' असे सांगीतले. ते कपाट उघड नव्हते त्यावेळी पाटील मॅडम यांनी बाजुचे बंद दाराकडे ईशारा करुन '' ईधरवाला ईधरवाला दरवाजा खोलो, अंदर रखो' असे म्हणाल्याने मी सदर दरवाजा उघडुन माझे हातातील लाच रक्कम असलेले पारदर्शक पाकीट दार उघडुन त्या खोलीतील बेडवर उशीचे खाली ठेवलो व मॅडम यांना सांगीतले की, '' ओ तकिये के इधर रख दिया..' मी तेथून बाहेर निघून आल्यानंतर लाचेची रक्कम स्विकारलेबाबत सापळा पथकातील पोलीसांनी पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर लागलीच पोलीसांनी श्रीमती पाटील मॅडम यांना रू. ४०,०००/— लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

समक्ष

त्यानंतर पोलीसांनी त्यांना त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्रीमती सुजाता आबासाहेब पाटील, वय ५६ वर्षे, धंदा— नोकरी, (सहाय्यक पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई नेमणुक — मेघवाडी विभाग, मुंबई )रा.ठि. ए विंग आदित्य को.ऑप.हौ. सोसायटी, रू.नं. १०१ वर्सोवा रोड, अंधेरी (प),मुंबई—५३ असे असल्याचे पंचांना व पोलीस पथकास सांगितले.

श्रीमती सुजाता पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग, मुंबई यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत. माझी तक्रार पोलीस ठाणेस नोंद करण्यास सांगण्यासाठी व जागेचा ताबा घेतलेल्या महिलेचा भविष्यात त्रास होऊ नये या कारणासाठी लोकसेवक श्रीमती सुजाता पाटील यांनी माझेकडे रु. १,००,०००/— लाचेची मागणी केली. त्यापैकी रू. १०,०००/— हे त्यांनी दि. ०६/१०/२०२१ रोजी स्विकारले. तसेच पडताळणी कारवाई दरम्यान तडजोडीअंती रू. ४०,०००/— लाचेची रक्कमेची मागणी करून ती लाच रक्कम दि. ०८/१०/२०२१ रोजी स्वत:साठी स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचुन दाखवुन हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(पंच ...)